# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 19 June 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **जनतेचा विश्वास हाच आपला अमूल्य ठेवा–पंतप्रधानांचं प्रतिपादन;शेतकरी सन्मान निधी योजनेत नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना १७ वा हप्ता जारी**
- **दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर इथं मुख्य कार्यक्रमाचं आयोजन**
- **विधान परिषदेच्या अकरा जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर**
- **राज्य सरकारसोबत शिष्टमंडळाची चर्चा नाही–ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांची स्पष्टोक्ती**

**आणि**

- **नियोजित शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी मराठवाड्यात शेतकऱ्यांची निदर्शनं**

***सविस्तर बातम्या***

देशातल्या जनतेने आपल्यावर विश्वास ठेवत, सलग तिसऱ्या कार्यकाळात सेवेची संधी दिली, जनतेचा हा विश्वासच आपला अमूल्य ठेवा असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. काल वाराणसी इथं पंतप्रधानांनी शेतकरी सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी केला, त्यावेळी ते बोलत होते...

***Byte...***

काल या योजनेअंतर्गत नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात, २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट जमा झाली. यापैकी महाराष्ट्रातल्या सुमारे नव्वद लाख अठ्ठेचाळीस हजार शेतकऱ्यांना, एक हजार आठशे पंचेचाळीस कोटी सतरा लाख रुपये वितरीत करण्यात आले.

दरम्यान, या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते, स्वयं सहाय्यता गटातल्या ३० हजारांहून अधिक महिलांना, कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटपही करण्यात आलं.

देशभरातली निवडक ५० कृषी विकास केंद्रं दूरदृश्य संवाद यंत्रणेच्या माध्यमातून या कार्यक्रमाशी जोडली गेली होती.

हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात, केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी शासन कटीबद्ध असून, विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विकास व्हावा, हाच सरकारचा उद्देश असल्याचं, रक्षा खडसे यांनी सांगितलं, त्या म्हणाल्या..

***Byte…***

****

योग तसंच भरड धान्यासंबंधी जागरूकता निर्माण करण्याचं आवाहन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना केलं आहे. यंदाच्या योगदिनी, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करावं, असंही त्यांनी म्हटलं आहे. स्वतःसाठी आणि समाजासाठी योग, ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे.

****

दरम्यान, येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा श्रीनगर इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

दरम्यान, योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उष्ट्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित काल सामाजिक माध्यमांवर सामायिक केली. या आसनामुळे पाठीचे

आणि मानेचे स्नायू मजबूत होतात, त्याचबरोबर रक्ताभिसरण सुधारण्यासोबतच दृष्टीही सुधारते. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

रिक्षा–टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रिक्षा टॅक्सी चालकांच्या शिष्टमंडळाच्या प्रतिनिधींशी बोलताना, या महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. ते म्हणाले...

***Byte...***

येत्या काही दिवसात या महामंडळाची रुपरेषा निश्चित करण्यात येईल, तसंच परिवहन विभागाच्या कार्यालयात स्वतंत्र खिडकी उघडून त्या माध्यमातून कार्ड काढून या महामंडळाचे लाभ रिक्षा टॅक्सी चालकांपर्यंत पोहचवण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम – २०२४ साठी, डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट पी एम एफ बी वाय डॉट जीओव्ही डॉट इन, या पोर्टलवर पीक विमा भरण्याला कालपासून सुरुवात झाली. या योजनेत सहभागी होण्याची अंतिम तारीख पंधरा जुलै ही असून, शेतकऱ्यांनी त्यापूर्वी विमा भरून घ्यावा, असं आवाहन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

****

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अकरा सदस्यांचा कार्यकाळ येत्या सत्तावीस जुलैला संपत असल्यानं निवडणूक आयोगानं या सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीची घोषणा केली आहे. याबाबतची अधिसूचना येत्या पंचवीस जूनला जारी होणार आहे. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख दोन जुलै ही असून, उमेदवारांना पाच जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता भासल्यास, येत्या बारा जुलैला मतदान तसंच सायंकाळी मतमोजणी होईल.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सुनेत्रा पवार यांची राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाल्याची अधिकृत घोषणा विधीमंडळ सचिवालयाकडून करण्यात आली आहे. या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा एकमेव अर्ज आल्यानं त्यांची बिनविरोध निवड झाली.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत..**

****

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठीच्या नीट परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करणाऱ्या याचिकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार तसंच राष्ट्रीय परिषदेला नोटीस बजावली आहे. या परीक्षेसंदर्भात झालेली संभाव्य छोटीशी चूकही दुरूस्त करणं आवश्यक असल्याचं, न्यायालयानं म्हटलं आहे.

दरम्यान, ही परीक्षा रद्द करण्याची मागणी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आली आहे. युवक काँग्रेसच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथंही यासंदर्भात आंदोलन करण्यात आलं.

****

राज्य पोलीस दलातल्या १७ हजारांहून अधिक पदांसाठी आजपासून मैदानी चाचणी सुरू होणार आहे. यात पोलीस शिपाई, चालक, बँडवादक, तुरुंग विभाग शिपाई अशा पदांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर इथं या पार्श्वभूमीवर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

****

राज्य सरकारसोबत चर्चेसाठी आपलं कोणतंही शिष्टमंडळ जाणार नसल्याचं, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सांगितलं आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी, जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं हाके यांच्यासह नवनाथ वाघमारे यांचं उपोषण सुरु आहे. राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

****

नियोजित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी काल मराठवाड्यात अंबाजोगाई, नांदेड, परभणी तसंच धाराशिव इथं शेतकऱ्यांनी निदर्शनं केली. या नियोजित महामार्गामध्ये मराठवाड्यातली पाण्याखालची सुपीक बागायती जमीन

जाणार असल्याचं सांगत, सुपीक जमिनींमधून हा मार्ग नेऊ नये, अशी मागणी आंदोलक शेतकऱ्यांनी केली आहे. याच मागणीसाठी काल कोल्हापूरमध्येही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा काढण्यात आला.

दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यातले शेतकरी मात्र शक्तीपीठ मार्गाचं समर्थन करत आहेत. राज्यात १२ जिल्ह्यातून जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याचं खोटं चित्र निर्माण केलं जात असल्याचा दावा या शेतकऱ्यांनी केला. या महामार्गामुळे रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होतील, तसंच धार्मिक स्थळांचा विकास होईल, त्यामुळे यासाठीची भूसंपादन प्रक्रिया योग्य मोबदला देऊन लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी या शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

****

वीजेचे स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय रद्द होईपर्यंत याविरोधात आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा, भारतीय कम्युनिस्ट पक्षानं दिला आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य विधीज्ञ अभय टाकसाळ यांनी ही माहिती दिली. यासंदर्भात दिलेलं कंत्राट विधानसभा निवडणुकीपूर्वी रद्द करण्याची मागणी टाकसाळ यांनी केली.

****

फिनलँड इथं झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेन्टल गोल्ड टूर स्पर्धेत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रानं सुवर्ण पदक जिंकलं आहे. नीरजनं ८५ पूर्णांक नऊ सात मीटर अंतरावर भाला फेकून ही कामगिरी केली.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट मधले सामने आजपासून सुरु होत आहेत. पहिला सामना दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेदरम्यान होणार आहे. भारताचा सुपर एट मधला पहिला सामना उद्या अफगाणिस्तानसोबत होणार आहे.

****

जालना जिल्ह्यात मंठा इथं सोळा वर्षीय दोन मुलांचा खाणीत साचलेल्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. पोहण्यासाठी पाण्यात उतरलेली ही मुलं बुडाल्याचं लक्षात येताच, नागरिकांनी त्यांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केलं.

****

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या पुढाकाराने लातूर जिल्ह्यात २०० हेक्टरवर भरड धान्याची पेरणी केली जाणार आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते काल लोदगा इथं स्वत: पेरणी करून या अभियानाला सुरुवात केली. जिल्ह्यात श्रीअन्नाची पेरणी जास्तीत जास्त क्षेत्रावर होण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत, असं आवाहन त्यांनी केलं.

****

नांदेड जिल्ह्यात देगलूर इथं काल दुपारी जोरदार पाऊस झाला. या पावसाने शहरवासियांची तारांबळ उडाली, तर बळीराजा मात्र आनंदित झाला आहे.

****